**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. कमलचंद्र तिवारी
सीजीओ, ( ग्रुप-अे ) राज्यशास्त्र विभाग,
राकेश शर्मा ब्लॉक, एन.डी.ए.
खडकवासला, पुणे-२३

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय,
साधु वासवानी चौक, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सहाय्य पोलीस आयुक्त,
शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५६ / पुणे / २००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.८.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.११.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुणे पोलिसांकडे नोंव्हेंबर २००४ ते आजपर्यंत दिलेल्या तक्रारींच्या आजच्या स्थिती-बाबत माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. कमलचंद्र तिवारी यांनी राष्ट्रीय सरंक्षण अकादमीतील श्री. एन.के. कुमार यांच्याविरूध्द दि. ३०.११.२००४ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे यांच्याकडे मागितली होती. आपल्याला समाधानकारक माहिती न मिळाल्याच्या कारणावरून श्री. तिवारी यांनी तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस आयुक्त, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु तेथेही आपल्याला चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्यामुळे श्री. तिवारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. तिवारी यांना माहिती देण्यात आली. तसेच कागदपत्रांचे अवलोकन करण्याची त्यांची मागणी होती, त्यानुसार अवलोकन करू देण्यात आले व त्यानंतर त्यांनी मागितल्याप्रमाणे कागदपत्रे, अर्ज शाखेकडून दि. १५.९.२००६ व दि. २१.९.२००६ रोजी देण्यात आली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. एम.पी. कराडे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. मात्र आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नसल्याचे श्री. तिवारी यांनी दि. २९.११.२००६ रोजी आयोगाला सादर केलेल्या पत्रात म्हटले आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. एम. एस. उंबरजे यांनी त्या संदर्भात पडताळणी करून आयोगाला दहा दिवसात अहवाल सादर करावा व कोणतीही माहिती द्यावयाची राहिली असल्यास त्याची पूर्तता करावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला.

दि. २४.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या वतीने श्री. मोकाशी नावाचे हवालदार उपस्थित होते. अन्य सर्व जण गैरहजर होते. सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून हवालदार पाठविणे व ते कोणत्याही अधिकारपत्राशिवाय, ही कृती गंभीर व आक्षेपार्ह आहे. अशा प्रतिनिधित्वाबाबत विद्यमान पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पुणे श्री. किरण शेलार यांनी दिलगिरी व्यक्त केली व या प्रकारची पुनरावृत्ती होणार

नाही, असे विनंतीपूर्वक निवेदन आयोगापुढील सुनावणीच्या वेळी केले. या अनुषंगाने दक्षता घेण्याची समज पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. दिलेल्या माहितीबाबत पडताळणी करून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय), पुणे शहर श्री. एम.एस.उंबरजे यांनी आयोगाला दहा दिवसांत अहवाल सादर करण्याच्या आदेशानुसार त्वरित पूर्तता करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३०.१.२००९**

प्रत : पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे यांना नोंद घेण्यासाठी.

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.ताजोद्दीन जिलानी जमादार
सर्व्हे नं.४९, हडपसर नेहरु पार्क,
रेल्वे गेट शेजारी, पुणे ४११ ०२८

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.,
विभागीय कार्यालय, तुळजापूर, जि.उस्मानाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.
उप विभाग, उमरगा, जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७१ / पुणे / २००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.८.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१२.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००६ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>मौजे मुरळी, ता. उमरगा येथील विद्युत ग्राहक क्र.५९७३१०२९६७९७ चे दि. १.१०.१९९७ रोजी मीटरप्रमाणे असलेल्या रीडिंगचे देयकाची प्रत व इतर अनुषंगिक एकूण दहा मुद्दयांची माहिती | |

## विवेचन

मीटर रीडिंग प्रमाणे विजेचे बिल न देता चुकीचे बिल दिले व त्याबद्दल तक्रार करूनही दुरूस्ती केली गेली नाही, या संदर्भात एकूण दहा मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. ताजोद्दीन जिलानी जमादार यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या. उप विभाग, उमरगा, जि.उस्मानाबाद यांच्याकडे मागितली होती. त्यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री. जमादार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या., उपविभाग, उमरगा, जि.उस्मानाबाद यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी अपील मान्य केले व जन माहिती अधिकाऱ्यांनी पाच दिवस विलंबाने माहिती दिल्याबद्दल प्रतिदिनी रू.२५०/- प्रमाणे शास्ती लावली. परंतु आपल्याला कोणतीही पूर्वकल्पना न देता मीटर काढून नेल्याबद्दल कायदेशीर तरतुदींची माहिती मिळावी व संबंधित कार्यवाही रद्द करावी, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांना फक्त पाच दिवसांकरिता शास्ती न करता दि. ३.९.२००६ ते ११.१२.२००६ या काळासाठी शास्ती करावी, अशा मागणीसाठी श्री. जमादार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अर्जातील दहा मुद्दयांची माहिती लेखा / तांत्रिक व इतर विभागाकडून घेऊन दिली. त्याच काळात आपल्याकडे अन्य उपविभागाचा अतिरिक्त पदभार होता, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस.के.ईटकर यांनी दि. २७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'चे वेळी प्रपत्रात नमूद केले. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. अे.एम. खांडेकर व अपिलीय प्राधिकारी श्री. एस.एस. तायडे यांनी त्याला दुजोरा दिला. अपीलकर्ता त्यावेळी गैरहजर होते.

आपण दि. ३.७.२००६ रोजी माहिती मागितली. प्रथम अपिलानंतर दि. ६.१२.२००६ रोजीच्या पत्राने माहिती दिली. आपल्याला मीटरच्या रीडिंगप्रमाणे बिल मिळाले नाही, तसेच सरासरी बिल द्यावयास हवे होते, त्याऐवजी नोटीस न देता मीटर काढून नेला. त्या अनुषंगाने त्याबाबतचे नियम / माहिती आपण मागितली होती, असे श्री. जमादार यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी यांना शास्ती करण्याचा अधिकार आपल्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये नाही. परंतु कार्यवाहीतील कर्तव्यपूर्तता न केल्याबद्दल प्रशासकीय अधिकारानुसार आपण जन माहिती अधिकारी यांना शास्ती केली होती, मात्र माहितीच्या अधिकारात अशा प्रकारची शास्ती करणे योग्य नसल्याचे श्री. एस.के.ईटकर यांच्या तक्रारीनंतर स्पष्ट झाल्यामुळे शास्तीची वसुल केलेली रक्कम त्यांना परत देण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. एस.एस. तायडे यांनी सांगितले.

अपीलकर्ता श्री. जमादार यांनी सन १९९७ ते २००० पासूनचे बिल भरलेले नाही. अशा प्रकारे बिल न भरल्यास घरगुती छोट्या ग्राहकाला मीटर काढून नेण्याबाबत पूर्वसूचना दिली जात नाही. बिल भरल्यास पावती दाखविली की विजेचा पुरवठा सुरू केला जातो. बिलाबाबतचा संगणकावरील तपशील श्री. जमादार यांना देण्यात आला आहे, असे श्री. तायडे यांनी नमूद केले.

श्री. जमादार यांची मुख्य मागणी कार्यवाहीची व त्याविषयीच्या तक्रारीची दखल घेण्याबद्दलची आहे. संबंधित माहिती त्यांना देण्यात आली आहे, त्याविषयीच्या विलंबाबाबतचे जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८.१.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ.विनायक चिंतामणी आगाशे
४८४/१०२, अनंत मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे ४११००९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस सहआयुक्त,
पुणे शहर, पुणे ४११ ००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
विश्रामबाग विभाग, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.विनायक चिंतामणी आगाशे
४८४/१०२, अनंत मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे ४११००९

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
विश्रामबाग विभाग, पुणे ४११ ००२ श्री.प्रशांत मोहिते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती (कालावधी २३.९.१९९२ ते २६ जुलै २००६)** <br><br> दि.२३.९.१९९२ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशनला नोंदविलेला गुन्हा र.नं.२२२/९२ भा.दं.वि. कलम ४६५, ४६८,४७०,४७१,३४ प्रमाणे नोंदविलेल्या गुन्ह्याबाबत माहिती. |

## विवेचन

विश्रामबाग पोलीस ठाण्यात नोंदविलेला गुन्हा क्र.२२२/९२ च्या संदर्भात अपीलकर्ता डॉ.विनायक चिंतामणी आगाशे यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त मुख्यालय, पुणे शहर यांच्याकडे माहिती मागितली होती. ती नाकारल्यामुळे डॉ.आगाशे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस सहआयुक्त, पुणे शहर यांच्याकडे अपील केले. अपिलाची सुनावणी होऊनही निर्णय मिळाला नाही, म्हणून डॉ.आगाशे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाच्या दि.२४.८.२००६ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. परंतु त्यात तीनही घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

कॉसमॉस सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक श्री.एस.एन.बुगदे व अन्य काही अधिकारी यांच्याविरुध्द आपण दि.२३.९.१९९२ रोजी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदविली. पोलिसांनी त्यानुसार गुन्हा नोंदविला. त्यानंतर या गुन्ह्याच्या संदर्भातील पुढील कार्यवाहीची माहिती सन १९९३ पासून आपण सातत्याने विचारत आलो, परंतु आपल्याला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. दि.१४.८.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात आपण ही माहिती मागितली, परंतु ती नाकारण्यात आली. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(एच) अन्वये माहिती देता येत नसल्याचे आपल्याला कळविण्यात आले. तपासात किंवा गुन्हेगारावरील कारवाईत अडथळा येण्याची शक्यता असल्यास माहिती नाकारण्याची तरतूद या कलमामध्ये आहे. परंतु यापूर्वी सन २००२ च्या महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायद्यान्वये

माहिती मागितली असता 'खरा, परंतु शोध न लागलेला' असे संबंधित गुन्ह्याचे वर्गीकरण पोलिसांनी केले असल्याचे पोलीस उपायुक्त, मुख्यालय यांनी आपल्याला कळविले होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज केल्यानंतर आपल्याला विश्रामबाग पोलीस ठाण्यात व नंतर मंडई पोलीस चौकीत कागदपत्रांची पाहणी करण्यास बोलाविण्यात आले. कागदपत्रे पाहून आपण कोणंती कागदपत्रे हवीत हे नमूदही केले. त्यानंतर तीन आठवड्यांनी आपल्याला माहिती नाकारण्यात आली असे डॉ.आगाशे यांनी सुनावणीच्या वेळी लेखी व तोंडी नमूद केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस सहआयुक्त, पुणे शहर श्री.प्रभातरंजन यांनी आपल्या अपिलाची सुनावणी घेतली, परंतु स्मरणपत्र देऊनही निर्णय दिला नाही, असे त्यांनी संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह नमूद केले.

डॉ.आगाशे यांनी एकाच कारणासाठी सहकार न्यायालयात व मुंबई उच्च न्यायालयात दावे दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रकरण तपासावर राहून अ वर्गात समरी मिळण्याची पोलिसांची मागणी दि.५.७.१९९३ रोजी न्यायालयाने मंजूर केली आहे. गुन्हा तपासावर असल्यामुळे माहिती देता येत नाही, असे तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त,पुणे श्री.प्रदीप बाबर, सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग श्री.प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त, चतुशृंगी विभाग, पुणे शहर श्री.एम.पी.कराडे अशा विविध अधिकाऱ्यांनी आयोगाला लेखी कळविले आहे. त्याचाच पुनरुच्चार श्री.प्रशांत मोहिते यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी याबाबतचे अहवाल वेळोवेळी सादर केले असून गुन्हा कायम तपासावर असल्यामुळे त्यातील माहिती दिलेली नाही, असे श्री.मोहिते यांनी नमूद केले.

सन १९९२ मध्ये दाखल झालेला व कायम तपासावर म्हणून १९९३ साली 'अ' वर्गात वर्ग झालेला गुन्हा असल्यामुळे माहिती देता येत नाही, हा पोलिसांचा दावा मान्य करता येत नाही. संबंधित गुन्ह्यातील कागदपत्रे वा माहिती देण्यास न्यायालयाने नेमक्या स्वरुपात मनाई केलेली नाही. अशा बाबतीत विषय न्यायप्रविष्ट असल्याचे कारण देता येणार नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ च्या कलम ८(१)(एच) चा चुकीचा अन्वयार्थ जन माहिती अधिकारी यांनी लावला आहे. 'खरा, परंतु शोध न लागलेला' असे वर्गीकरण असलेला गुन्हा तपासावर

असल्याच्या कारणावरुन १५ वर्षांहून अधिक काळ नागरिकांना माहिती नाकारली जाते, हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या व नोकरशाहीत उत्तरदायित्व राखण्याच्या तत्त्वाशी विसंगत आहे. कायम तपास चालू याचा अर्थ कधीही माहिती न देण्याची सबब असे होता कामा नये. हे लक्षात घेता अपीलकर्त्याला माहिती दिली गेली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) संबंधित संपूर्ण माहिती चार दिवसात अपीलकर्त्यास देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग, पुणे शहर श्री.प्रशांत मोहिते यांनी आयोगाला दि.५.२.२००९ पर्यंत त्वरित सादर करावा.

(३) अपिलाचा निर्णय न देण्याची अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस सहआयुक्त, पुणे शहर श्री.प्रभातरंजन यांची कृती योग्य नाही. त्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.१.२००९

३५-३८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश भिमराव नारायणकर
विद्या विकास मंदिर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक विभाग),
जिल्हा परिषद, पुणे

२. **अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी,
अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे — उत्तरवादी

१. **जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक विभाग),
जिल्हा परिषद, पुणे

२. **जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, विद्या विकास मंदिर,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अवसरी बु.,
ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२२+९७२ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** : श्री.रमेश भिमराव नारायणकर
विद्या विकास मंदिर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक विभाग),
जिल्हा परिषद, पुणे

२. **अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी, अवसरी बु.,
ता.आंबेगाव, जि.पुणे

१. **जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक विभाग),
जिल्हा परिषद, पुणे
२. **जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, विद्या विकास मंदिर,
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अवसरी बु., ता.आंबेगाव, जि.पुणे

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९२२/पुणे | २२.२.२००७ | २१.३.२००७ | २९.३.२००७ | १३.१२.२००७ |
| ९७२/ पुणे | ३.३.२००७ | १४.३.२००७ | ६.३.२००७ | ३.८.२००७ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र.९७२**

मुख्याध्यापक स्टेशनरीचा गैरवापर करून श्रीमती एम.डी. खानदेशे यांनी आणलेली मान्यता ग्राह्य धरु नये त्या दि. १०.९.२००५ चे पत्राची प्रत, डी.एड वेतनश्रेणीत नियुक्त केलेले प्रशिक्षित पदवीधर असताना खुल्या बाजारातून प्रशिक्षित पदवीधर भरण्यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या परवानगीची/अहवालाची प्रत, दि. ३१.८.०५, ९.१०.२००५, ३०.१०.२००६ व दि. ६.२.२००७ च्या तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल, श्रीमती एस.के. सोनवणे यांची नियमात असलेल्या डी.एड. वेतनश्रेणीतील शिक्षणसेवक ते शिक्षक या मान्यतेवर आक्षेप दर्शविला आहे, त्याची कारणे इ. माहिती

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रमेश भिमराव नारायणकर यांनी मागितलेली माहिती प्रश्नोत्तराच्या स्वरूपात असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), जिल्हा परिषद, पुणे यांनी माहिती देण्याचे नाकारले, म्हणून श्री.नारायणकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे अपील केले. पंधरा दिवसात माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), जिल्हा परिषद, पुणे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), यांना दिले. परंतु त्यानुसार माहिती न मिळाल्याच्या कारणावरून श्री. नारायणकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

माहिती मिळाली नसल्याचे श्री. नारायणकर यांनी दि. २७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'चे वेळी प्रपत्रात नमूद केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी त्यावेळी उपस्थित नव्हते. शिक्षणाधिकाऱ्यांनी दि. १५.४.२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही व्हावी अशी मागणी श्री. नारायणकर यांनी प्रपत्रात नोंदविली.

विद्या विकास मंदिर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अवसरी बु., ता. आंबेगाव या शाळेतील नियुक्त्या करताना पात्रता डावलून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या नातेसंबंधितांना स्थान दिले. त्यामुळे आपल्यावर व अन्य शिक्षकांवर अन्याय झाला, अशी श्री. नारायणकर यांची तक्रार असून त्यासंदर्भात त्यांनी माहिती मागितली आहे. त्यातील काही माहितीची विचारणा करणे अथवा खुलासा मागणाच्या स्वरूपातील आहेत. त्याआधारे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), जिल्हा परिषद, पुणे यांनी माहिती नाकारली. मात्र अशी कारणे विचारणाच्या मुद्दयांवरील (मुद्दा क्र.४) माहिती श्री. नारायणकर यांना त्यांनी दिली. मुद्दा क्र. १ ते ३ बाबतची माहिती पंधरा दिवसात देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकार तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), जिल्हा परिषद, पुणे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार टपालाने माहिती पाठविली, परंतु 'Not known', असा शेरा मारून हे टपाल परत आले. माहिती तयार आहे, परंतु श्री. नारायणकर यांचा संपर्क न झाल्यामुळे ती देता आली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग ), जिल्हा परिषद, पुणे श्री. सिध्दार्थ चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग ) जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब यांनी सुनावणीत नमूद केले. संबंधित पत्रासह पुरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. पाठविलेल्या माहितीची प्रत श्री. नारायणकर यांना द्यावी असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

---

**अपील क्र.९२२**

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

अपीलकर्ता व श्रीमती एम.डी.खानदेशे यांचे डीएड वेतनश्रेणीतील नियुक्तीचे आदेश. श्रीमती खानदेशे यांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणीत मान्य केल्याचा शाळा समिती / समन्वय समितीचा-सभेचे संपूर्ण प्रोसिडिंग प्रत, सेवाज्येष्ठता डावलून बीएड वेतनश्रेणी देण्याबाबतचे शिक्षणाधिकाऱ्यांचे पूर्व परवानगीचे पत्र, मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविल्याची प्रत, तीन वेळा रद्द झालेली मान्यता पूर्ववत ठेवल्याबाबतची पत्रे, प्राचार्याकडून शिक्षणाधिकारी यांना देण्यात आलेले पत्र, अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा लेखी अहवाल, प्रशिक्षित पदवीधर उपलब्ध असताना जून २००५ पासून आजतागायत भरलेल्या जागाबाबतचे शिक्षणाधिकाऱ्याचे पत्र

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रमेश भिमराव नारायणकर यांनी श्रीमती एम.डी.खानदेशे यांचे डीएड वेतनश्रेणीतील नियुक्तीचे आदेश, त्यांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणीत मान्य केल्याचा शाळा समिती / समन्वय समितीचा/सभेचे संपूर्ण प्रोसिडिंग प्रत, व इतर अनुषंगिक माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, विद्या विकास मंदिर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अवसरी बु. यांच्याकडे मागितली होती. तसेच श्रीमती एम.डी. खानदेशे यांची मान्यता तीन वेळा रद्द झाल्याचे व पुन्हा तीन वेळा अद्यावत ठेवण्याच्या अनुषंगाने झालेला पत्रव्यवहार व त्याबाबतची कारणे अशा स्वरूपाची माहिती त्यांनी मुख्यतः मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी ती अपूर्ण दिली व आपली फसवणूक केली अशा कारणावरून श्री. नारायणकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी, अवसरी बु. ता.आंबेगाव यांच्याकडे अपील केले. आपण नऊ मुद्दयांची माहिती मागितली होती, त्यातील मुद्दा क्र. ३, ६ व ९ ची माहिती मिळाली नाही व मिळालेल्या माहितीने आपले समाधान झाले नाही, असे श्री. नारायणकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात व सुनावणीत नमूद केले. परंतु श्री. नारायणकर हे याच विद्यालयात पुर्णवेळ शिक्षक असून प्राचार्याच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, विद्या विकास मंदिर, अवसरी बु. यांनी नमूद केले. खुल्या बाजारातून शिक्षक भरती अशा स्वरूपाची मागणी त्यांनी मुद्दा क्र.९ मध्ये मागितली होती, ती मागणी स्पष्ट न झाल्यामुळे ती माहिती दिली नव्हती. मुद्दयाचे स्पष्टीकरण झाल्यामुळे ती आता देण्यात येईल, असे दि. २७.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त प्रपत्रात नमूद केले होते. त्यानुसार माहिती देण्याची तयारी दर्शविली असता त्यांनी ती स्वीकारली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, व अपिलीय प्राधिकारी तथा कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी, अवसरी बु. यांनी नमूद केले.

आपल्यावर अन्याय झाला असून त्याविरूध्द आपण दाद मागत आहोत. माहिती विहित मुदतीत मिळाली असती तर न्यायालयीन कामकाजासाठी त्याचा वापर करता आला असता. ती वेळेत न मिळाल्यामुळे आपल्याला न्याय मिळण्यास अडचण निर्माण झाली, असे प्रतिपादन श्री. नारायणकर यांनी केले. मात्र सेवा ज्येष्ठतेबाबत श्री. नारायणकर यांनी नमूद केलेली माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी आहे, तसेच वारंवार त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारावर त्यांना माहिती देण्यात आली आहे. मात्र त्रास देण्याच्या भूमिकेतून श्री. नारायणकर माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहेत, असे प्रतिपादन प्राचार्य श्री. पांडुरंग रामभाऊ हिंगे यांनी केले. श्री. नारायणकर यांच्या बरोबरच त्यांच्या पत्नी श्रीमती स्मिता काशिनाथ सोनवणे यांना नेमणूक देऊन संस्थेने सहकार्यच केले आहे, असे कार्याध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी, अवसरी बु. श्री. गणपत भगवंतराव हिंगे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

जाहिरात देऊन भरती केल्याच्या नियमांचे पालन करणे-न करणे, शिक्षक मान्यता देणे व रद्द करणे हा कार्यवाहीचा विषय आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये त्याचा समावेश होत नाही. मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्याकडील माहिती व शिक्षण संस्थेच्या कार्यालयाकडील माहिती या संदर्भात मुख्याध्यापक / प्राचार्य संस्थेकडील पूर्ण माहिती देऊ शकत नाही, असे प्राचार्य श्री. पांडुरंग

रामभाऊ हिंगे यांच्या निवेदनावरून स्पष्ट होते. याच स्थितीत त्यांनी संस्थेकडील माहितीच्या मुद्दयांबाबत अर्ज संस्थेकडे पाठविणे आवश्यक होते. श्री. नारायणकर संस्थेकडे व शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे विविध स्वरूपाचा पत्रव्यवहार व तक्रारी करीत असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरून दिसते. त्यांच्या अपिलामधील विषय पुर्णत: व्यक्तिगत स्वरूपाचा आहे. अशा विषयामध्ये माहिती मागताना त्याला त्रास देण्याचे स्वरूप देण्यात येणार नाही, याची दक्षता अपीलकर्त्याने घेण्याची आवश्यकता आहे, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. २९.१.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विनायक रामचंद्र फाटक
रा. बागेश्री, सहजीवन सोसायटी (२),
९१/१, पर्वती, पुणे-४११ ००९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक
तथा जिल्हाधिकारी मुद्रांक, पुष्पा हाईट्स,
बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-३७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक
हवेली (२) पुष्प मंगल कार्यालय बिल्डिंग, २ रा मजला,
बिबवेवाडी कॉर्नर, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४६ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |
| ३ | उपस्थित<br>अपीलकर्ता - गैरहजर<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक<br>तथा जिल्हाधिकारी मुद्रांक, पुणे<br>**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक हवेली (२) पुणे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.९.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.१०.२००७ |
| ७ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>दस्त क्र.३८४४/८६ या दस्ताची पडताळणी करून अधिनियमानुसार नोंदणीची कार्यवाही पूर्ण करून दस्तऐवज देणेबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता डॉ. वि.रा.फाटक यांनी दस्त क्र. ३८४४/८६ या दस्ताची पडताळणी करून अधिनियमानुसार नोंदणी करून ते दस्तऐवज परत देण्याच्या कार्यवाहीची मागणी जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक हवेली (२) पुणे यांच्याकडे केली होती.

जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक हवेली (२) पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) पुणे-१ यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील दाखल केले आहे. सदर अपिलाच्या सुनावणी दरम्यान अपीलकर्त्यास आवश्यक दस्त देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. वास्तविक मागितलेली 'माहिती' नसून प्रशासकीय कार्यवाहीचा विषय आहे. माहितीचा अधिकार अधिनियमात तो येत नाही, तसेच कार्यवाहीही झाली आहे.

सबब, आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३.१.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २२-०८-२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. हेमंत दिलीप शिवदास एफ-१, एम.एस.प्लाझा, ६क, कामाठीपूरा, सातारा यांच्या खालील अपिलाचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९८ / सातारा | सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे, पी.एम.टी. वर्कशॉप इमारत, पुणे | अध्यक्ष, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, जुने विधानभवन, पुणे | विभागीय जाती प्रमाणपत्र समिती, पुणे यांच्या माहे डिसेंबर २००६ व जानेवारी २००७ च्या बैठकीच्या इतिवृत्ताची साक्षांकित प्रत व समितीला तपासणीसाठी मिळलेल्या अर्जांची व अध्यक्षांनी विहित केलेल्या नोंदवहीची माहे जुलै ते सप्टेंबर २००६ ची छायाप्रत | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने जन माहिती अधिकाऱ्यांस त्यांच्या दिनांक ०८-०९-२००८ च्या पत्रान्वये कळविले. |

अपीलकर्ता श्री. हेमंत दिलीप शिवदास यांनी श्री. संजय कदम तत्कालीन सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांच्याकडून माहिती मिळण्यास उशीर झाल्यामुळे त्यांना शास्ती करण्याबाबत मागणी केली आहे. समितीकडे पुणे विभागातील पाच जिल्ह्यांचे कामकाज होते व त्यावेळी अतिशय कमी कर्मचारी वर्ग होता. समितीकडील कामाची व्याप्ती जास्त होती. अन्य कार्यालयांतील कर्मचाऱ्यांकडून तात्पुरत्या कामकाज व्यवस्थेअंतर्गत कामकाज करुन घेण्यात येत होते. त्यामुळे त्यानंतर समितीची पुनरर्चना करुन पुणे विभागासाठी तीन समित्या स्थापन करण्यात आल्या. या सर्व बाबींमुळे अपीलकर्त्यास माहिती देण्यास विलंब झाला, असे विद्यमान सदस्य सचिव, श्री. प्रमोद

जाधव यांनी दिनांक २२-०८-२००८ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रामध्ये नमूद केले. हा खुलासा मान्य करुन शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे, श्री. संजय कदम यांनी विलंबाबाबत या परिस्थितीची कल्पना अपीलकर्त्यास देणे आवश्यक होते, त्याबाबत श्री. संजय कदम यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५-०१-२००९**